# ऑनलाईन सेवांच्या माहितीसाठी कार्यशाळा

उस्मानाबाद : 'आमचा गाव आमचा विकास' या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद कार्यालयामार्फत आयोजित एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळेस प्रतिसाद मिळाला. गावांचा विकास करण्यासाठी विविध कार्यालयामार्फत त्यांच्या योजना व पुढील नियोजनाबाबत जनजागृती करण्यासाठी ऑनलाईन सेवांच्या माहितीचे सादरीकरण करण्यात आले.

डिजिटल इंडिया प्रोग्रामअंतर्गत नागरिकांना विविध सेवा पुरविल्या जातात. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विविध विषयांची माहिती सर्वांसाठी इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध असते. प्रशासनामार्फतदेखील जनतेसाठी ई-गव्हर्नर्सच्या माध्यमातून विविध सेवा पुरविल्या जातात. परंतु गाव पातळीवर जनजागृतीअभावी या सेवांचा लाभ घेतला जात नाही. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी एनआयसी विभागाचे के. बी. कोंडेकर यांनी केंद्र व राज्य शासनामार्फत व जिल्हास्तरावर ई-गव्हर्नर्सच्या अंतर्गत सुरु असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. त्या अंतर्गत जनतेसाठी उपलब्ध सेतू व संग्राम केंद्र यांच्यामार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध ऑनलाईन सेवांची माहिती दिली. विशेषतः गावपातळीवरील शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी व विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध ऑनलाईन सेवांची माहिती देण्यात आली.

गावातील नागरिकांना ई-गव्हर्नर्स, आयसीटीबाबत जनजागृती विषयक विकास म्हणजेच आपल्या गावांचा विकास ही संकल्पना खऱ्या अर्थाने साकारता येऊ शकेल. अशा प्रकारचे सादरीरण करण्यात आले. गाव पातळीवरील विविध विभागांमार्फत नागरिकांना ई-सेवेसाठी डिजिटल इंडियाअंतर्गत असलेल्या . अशा सर्व बाबींचा समावेश करणे गरजेचे असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद रायते यांनी सांगितले. यावेळी अतिरिक्त जिल्हा सूचना अधिकारी पी. एन. रुक्मे यांची उपस्थिती होती. (प्रतिनिधी)